# मराठी विज्ञान परिषद

मराठी विज्ञान परिषद, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई - ४०००२२

दूरध्वनी (०२२) - २४०५ ४७१४ / २४०५ ७२६८

**ई-मेल:** office@mavipamumbai.org **संकेत स्थळ:** www.mavipamumbai.org

## मराठी विज्ञान परिषदेचा

## श्री. सुधाकर अुद्धवराव आठले विज्ञान प्रसार पुरस्कार (२०२१)

विज्ञानाचा प्रसार मराठीतून करण्याचे उद्दिष्ट ठेऊन २४ एप्रिल १९६६रोजी मराठी विज्ञान परिषदेची स्थापना झाली. विज्ञानाचे जीवनात महत्त्व वाढवून विज्ञानाधिष्ठित समाज घडविण्यात मराठी विज्ञान परिषदेने योगदान दिले आहे. त्याचबरोबर समाजाची प्रगती विज्ञानामुळेच होणार हा विचार सर्वसामान्य जनतेत रुजविण्याचे कार्य मराठी विज्ञान परिषद करीत आहे. या कार्याचा आवाका खूप मोठा आहे. त्यामुळे समविचारी संस्था अथवा व्यक्ती यांच्या सहकार्याने, तर कधी त्यांना प्रोत्साहन देऊन मराठी विज्ञान परिषदेचे हे कार्य अविरत सुरू आहे.

समाजात वेगवेगळ्या प्रकारे विज्ञान प्रसाराचे कार्य करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या कार्याची दखल घेऊन मराठी विज्ञान परिषदेने पुरस्कार देऊन गौरवण्याचे ठरविले आहे. या पुरस्काराचे नाव आहे श्री. सुधाकर अुद्धवराव आठले विज्ञान प्रसार पुरस्कार.

**श्री. सुधाकर अुद्धवराव आठले यांचा परिचय-**

श्री. सुधाकर अुद्धवराव आठले यांचा जन्म १७ एप्रिल १९२१ यादिवशी मध्य प्रदेशातील खांडवा येथे झाला. शिक्षण - पदवीधर. गेली ६० वर्षे ते मुंबईतील गोरेगांव येथे वास्तव्यास आहेत. तरुण वयातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आल्यामुळे सामाजिक बांधीलकी त्यांनी आयुष्यभर जपली. वैयक्तीक जबाबदाऱ्यांमुळे ज्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी होता येत नसेल तेथे इतर मार्गाने योगदान देऊन त्याची उणीव भरून काढणे हा मार्ग त्यांनी स्वीकारला. काटेकोर आर्थिक नियोजन व चांगल्या कंपन्यांच्या समभागामध्ये गुंतवणूक यामुळे आजवर निरनिराळ्या सामाजिक संस्थांना तीस लाखांहून अधिक देणग्या श्री. सुधाकर अुद्धवराव आठले ह्यांनी दिल्या आहेत. कामगार राज्य विमा निगम येथून निवृत्ती स्वीकारल्यावर पुढील आयुष्यात अनेक सामाजिक - राजकीय जबाबदाऱ्या त्यांनी स्वीकारल्या आणि प्रामाणिकपणे पूर्ण केल्या. काही काळ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणूनही त्यांनी काम केले.

हे सर्व करत असतांना समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होणे गरजेचे आहे याची जाणीव झाल्याने विज्ञानाचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्या व्यक्तीचे कौतुक करून त्यास प्रोत्साहन द्यावे या विचाराने मराठी विज्ञान परिषदेच्या माध्यमातून श्री. सुधाकर अुद्धवराव आठले विज्ञान प्रसार पुरस्कार योजना त्यांनी सुरू केली.

# मराठी विज्ञान परिषद

मराठी विज्ञान परिषद, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई - ४०००२२
दूरध्वनी (०२२) - २४०५ ४७१४ / २४०५ ७२६८
**ई-मेल:** office@mavipamumbai.org **संकेत स्थळ:** www.mavipamumbai.org


**पुरस्काराचे नियम व अटी-**

१. '**श्री. सुधाकर अुद्धवराव आठले विज्ञान प्रसार पुरस्कार**' असे या पुरस्कार योजनेचे नाव आहे.

२. समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी विज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दरवर्षी दिला जाईल.

३. मराठी विज्ञान परिषदेच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र आणि रूपये २५,०००/-, असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

४. अर्ज केलेल्या अथवा नामनिर्देशित प्रवेशिकांमधून एका प्रवेशिकेची निवड मराठी विज्ञान परिषदेने नेमलेल्या समितीमार्फत केली जाईल आणि त्या समितीचे निर्णय अंतिम राहतील.

५. एकदा पुरस्कार मिळालेली व्यक्ती पुन्हा या पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही.

६. प्रवेशिका मागविण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेच्या वेबसाईटवर **(www.mavipamumbai.org)** आणि मुंबईच्या मराठी वर्तमानपत्रात दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात निवेदन प्रसिद्ध केले जाईल.

७. या पुरस्काराच्या प्रवेशिका ३१ डिसेंबर २०२०पर्यंत मराठी विज्ञान परिषदेकडे पुढील ई-मेलवर **office@mavipamumbai.org** किंवा मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई-४०००२२ या पत्त्यावर पाठवाव्यात.

८. परिषदेकडे माहिती पाठवताना आपले पूर्ण नाव, जन्म दिनांक, शिक्षण, कुठे काम करता ते, ई-मेल पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक आणि कामाचे विस्तृत सचित्र वर्णन आणि असल्यास चित्रफित पाठवावी.

९. पुरस्कार त्या-त्या वर्षीच्या ३१ डिसेंबरला ६० वर्षाखाली वय असणाऱ्या व्यक्तीलाच मिळेल.

१०. दरवर्षी एप्रिलमध्ये परिषदेचा वर्धापन दिन २५ एप्रिल'च्या निकटच्या रविवारी असतो. त्यावेळी हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

११. पुरस्कार वितरण समारंभात पुरस्कार प्राप्त व्यक्तीने ८ ते १० मिनिटात आपले काम सादर करणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार संगणकीय सादरीकरणाची व्यवस्था केली जाईल.

१२. बाहेरगावच्या व्यक्तीला वेगळा प्रवास / निवास खर्च दिला जाणार नाही.

१३. वरील नियम शिथिल किंवा त्यात बदल करण्याचे अधिकार मराठी विज्ञान परिषदेकडे रहातील.

कार्यवाह
मराठी विज्ञान परिषद